# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**Case No: CGRF/AZ/U/160/2008/81/** **Date:-**
**To,**

**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer,**
**O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Dr.Narayan Raghunath Rajderkar, Dr.N.R.Rajderkar, Sai Sadan, Mill Corner, Kotwalpura, Aurangabad.(Consumer No. 490011027510)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Dr.Narayan Raghunath Rajderkar, Dr. N.R.Rajderkar, Sai Sadan, Mill Corner, Kotwalpura, Aurangabad.

You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of receipt of this letter along with. related documents.

**The hearing in this matter is kept on 19/12/208 at 15=00 Hrs.**

**Member/Secretary**
Consumer Grievance Redressal Forum,
MSEDCL (AZ) Aurangabad.

**Encl As above.**

Copy to:-
Dr.Narayan Raghunath Rajderkar,
Dr.N.R.Rajderkar, Sai Sadan,
Mill Corner, Kotwalpura,
**Aurangabad.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१६०/२००८/८१**

| | |
|---|---|
| **तक्रार दाखल** | **दिनांक ;- ०५/१२/२००८** |
| **निकाल** | **दिनांक ;- १९/०१/२००९** |

**डॉ.नारायण रघुनाथ राजदेरकर,**
**साई-सदन मिल् कॉर्नर रोड,**
**कोतवालपुरा, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११०२७५१०)** **अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहर मंडल औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

**आदेश**

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०५/१२/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. नोडल अधिकारी यांना त्यांचे म्हणणे मंचास दाखल करण्याकरीत दिनांक १९/१२/२००८ ही तारीख देण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने साई सदन, कोतवालपुरा येथील निवास स्थानासाठी महावितरण कंपनीकडुन वीज पुरवठा घेतला असुन त्यांना सतत चुकीच्या वीज बिलाची आकारणी करण्यात आल्यामुळे व त्यांनी केलेल्या तक्रारीची महावितरण कंपनीने कोणतीही दखल न घेतल्यामुळे त्यांनी मंचात तक्रार दाखल केली, असुन महावितरण कपनीस सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे. दिनांक १९/१२/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री राजदेरकर तसेच नोडल अधिकारी श्री राठौर उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी अर्जदारास मीटरवरील नोंदीऐवजी सरासरीवर आधारीत वीज बिल आकारणी केल्याचे मान्य करीत वीज बिल दुरूस्त करून देण्याची तयारी दर्शविली नोडल अधिकारी यांनी बिल रिव्हीजन तसेच सी.पी.एल. प्रत मंचात दाखल केली दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर मंचाने नोडल अधिकारी यांना मीटर बदली अहवाल दिनांक २४/१२/२००८ पर्यंत दाखल करण्याचे सांगत प्रकरण निकालासाठी ठेवले.

२) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरून सी.पी.एल. वरून असे आढळुन येते की,महावितरणतर्फे अर्जदारास जानेवारी २००७ ते ऑक्टोंबर २००७ या काळात अनेकवेळा सरासरीवर आधारीत वीज बिल आकारण्यात आले आहे. ऑक्टोबर २००७ मध्ये त्यांचे जुने मीटर क्रमांक ०००६२७२० बदलण्यात आले व त्याजागी नवीन मीटर क्रमांक ०७४३६०० लावण्यात आले.वीज मीटर बदलतांना जुन्या मीटरची अंतिम रिडींग ८१५० तर नवीन मीटरची चालु रिडींग ०००१ असल्याचे स्पष्ट होते. यावरून अर्जदाराचा जानेवारी २००७

ते १२/१०/२००७ या काळात एकुण वीज वापर हा ( ८१५०-४३३८) ३८१२ असा असुन १२/१०/२००७ ते नोव्हेंबर २००८ या काळात एकुण वीज वापर (३१११-०००१) ३११० युनिट असा असल्याचे दिसून येते. योग्य वेळी रिडींग न घेता सरासरीवर आधारीत बिल आकारले गेल्यामुळे ग्राहकाच्या वीज बिलात व्याज व दंडा ची रक्कम लावण्यात आली असल्याचे दिसुन येते जे चुकीचे असल्याचे मंचाचे मत आहे.

वरील सर्व बाबीवरून महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास चुकीच्या वीज बिलाची आकारणी करण्यात आल्याचे स्पष्ट होते.अर्जदाराने दाखल केलेली तक्रार योग्य असुन मंच याप्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास जानेवारी २००७ ते १२/१०/२००७ या काळात जुन्या मीटरवरील नोदीप्रमाणे तसेच १२/१०/२००७ ते नोव्हेबर या काळात नविन मीटर वरील नोंदीप्रमाणे वीज बिल आकारणी करावी व ती त्या काळात विभागुन देत अर्जदारास ३० दिवसात सुधारीत वीज बिल देण्यात यावे.

२) वरील प्रमाणे सुधारीत बिल आकारतांना त्यात कोणतेही व्याज व दंड आकारू नये व अर्जदाराने भरलेल्या रक्केची त्यातुन वजावट करावी

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१६०/२००८/८१** **दिनांक ;-**

**प्रति**
**डॉ.नारायण रघुनाथ राजदेरकर,**
**साई-सदन मिल् कॉर्नर रोड,**
**कोतवालपुरा, औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१६०/२००८/८१ )

आपण दिनांक ०५/१२/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**